**जिल्हाधिकारी, नाशिक व छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने**

# जाहिरात २०२४-२५

शासन निर्णय क्रमांक : वसति ५३१७ /प्र.क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक, येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा लक्षित गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग गटातील ७५ मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकूण २०० विद्यार्थीनींसाठी वसतिगृह सुरू करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ या वर्षाकरीता मातोश्री मुलींचे वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथील विद्यार्थिनीच्या वसतिगृह प्रवेश जाहिरात उपव्यवस्थापकीय संचालक, सारथी नाशिक यांच्याकडील दि. ०३/०३/२०२३ रोजी प्रसिद्ध करणेत आलेल्या जाहिराती अन्वये प्रवेश प्रक्रिया प्रथम टप्पा पार पडल्यानंतर ६३ विद्यार्थीनींचा प्रत्यक्ष प्रवेश निश्चित झालेला असून उर्वरित १३७ रिक्त जागांच्या प्रवेशाकरीता अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या (अपवाद पदविका परीक्षा उत्तीर्ण होऊन पदविसाठी प्रवेश घेतलेल्या द्वितीय वर्षाच्या) विद्यार्थिनींसाठी खालील प्रमाणे रिक्त जागांच्या तपशीलानुसार जाहिरात प्रसिध्द करणेत येत आहे.

**मातोश्री शासकीय २०० मुलींचे वसतिगृहामध्ये अभ्यासक्रमनिहाय प्रवेशासाठीची संख्या खालीलप्रमाणे राहिल.**

| **मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथील सारथीच्या ७५ व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत ५० विद्यार्थीनींसाठी प्रवेशासाठीची संख्या खालीलप्रमाणे :** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **अभ्यासक्रम** | **सारथी मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या : ७५** | **उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या : ५०** |
| १ | व्यवसायिक पदवी | ५२ | उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्राप्त निर्देशानुसार ही ५० विद्यार्थिनींची अभ्यासक्रमनिहाय विगतवारी यादी निश्चित करण्यात येईल. |
| २ | बिगर व्यवसायिक पदवी | १२ | |
| ३ | पदव्युत्तर पदवी | ११ | |
| ४ | प्रत्यक्ष प्रवेश निश्चित | ३४ | ०५ |
| ५ | रिक्त जागा | ४१ | ४५ |

**<u>सदर पदांना आरक्षणाचे प्रचलित शासन धोरण लागू राहील.</u>**

सारथी व उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थिनीच्या प्रवेशासाठीचे आवश्यक निकष, अटी व शर्ती संकेतस्थळावर उपलब्ध असून अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि.२०/०८/२०२४ पर्यंत राहील.

**सारथी विभागीय कार्यालय**

पत्ता – बॅरेक क्र. ८, विभागीय आयुक्त कार्यालय आवार नाशिकरोड, नाशिक, पिन कोड – ४२२ १०१.
संपर्क : फोन नं- ०२५३-२९९३६८९
ई-मेल : divnashiksarthi@gmail.com.
संकेतस्थळ : https://sarthi- maharashtragov.in/

सदरची जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकित करून पोस्टाद्वारे / प्रत्यक्ष सारथी संस्थेचे नाशिक येथील वरील पत्यावर दिनांक २१/०८/२०२४ पावेतो सादर करावेत.

**टीप :**

१. वसतिगृह लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी शासनाच्या इतर वसतिगृहाच्या योजनेचा दुहेरी आर्थिक लाभ घेतलेला नसावा.
२. वसतिगृहात प्रवेश देण्यात येणाऱ्या पात्र मुलींची यादी सबंधित सारथी / उच्च व तंत्र शिक्षणविभाग यांनी कागदपत्रांची पडताळणी करुन अंतिम केल्यानंतर सारथीचे संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
३. पात्र विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रत्यक्ष दाखल (हजर) होण्याचा दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**उपरोक्त प्रवेशाच्या जागा व धोरणांमध्ये बदल करणेचा अधिकार मा. उपव्यवस्थापकीय संचालक, सारथी, विभागीय कार्यालय, नाशिक यांचा असेल.**

दि.०२/०८/२०२४
ठिकाण : नाशिक

(पल्लवी निर्मळ)
उपव्यवस्थापकीय संचालक,
सारथी, विभागीय कार्यालय, नाशिक तथा
उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र.२), नाशिक